# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 21-06-2024

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये भिवापूर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-06-21 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2024-06-22 | 2024-06-23 | 2024-06-24 | 2024-06-25 | 2024-06-26 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 11.3 | 16.1 | 30.4 | 0.0 | 0.9 |
| कमाल तापमान (अं.से) | 33.8 | 35.4 | 32.3 | 34.3 | 35.4 |
| किमान तापमान (अं.से) | 23.7 | 22.5 | 22.5 | 24.7 | 24.8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 82 | 84 | 81 | 69 | 71 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 50 | 53 | 58 | 52 | 41 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 13 | 12 | 7 | 9 | 13 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 248 | 288 | 234 | 203 | 270 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 8 | 6 | 6 | 8 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक२२ ते २६ जून २०२४ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २२, २३, २४, २५ व २६जून २०२४ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक २२ व २३ जून २०२४ रोजी वादळी वाऱ्यासह (४०-५० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • दिनांक २४ जून २०२४ रोजी मुसळधार पाऊस व वादळी वाऱ्यासह (३०-४० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • दिनांक २५ व २६ जून २०२४ रोजी वादळी वाऱ्यासह (३०-४० किमी/तास) मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यतावर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील २४ तासामध्ये कमाल तापमान २-३ अंश सेसिअस ने कमी होईल व त्यानंतर कमाल तापमानातपुढील ४ दिवसासाठी फारसा बदल होणार नाही. • पुढील ५ दिवसांत विदर्भामध्ये किमान तापमानात फारसा बदल होणार नाही. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक २६ जून ते ०२ जुलै २०२४ दरम्यान सरासरी पेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता तर कमाल तापमान सरासरी प

### कृषि सल्ला:

• भारतीय हवामान विभागाच्या दैनंदिन पर्जन्यमान निरीक्षण प्रणाली च्या अहवालानुसार पेरणीयोग्य (७५ ते १०० मिमी) पाऊस झाला नसल्याने पेरणीची घाई करू नये, शेतकरी बांधवांनी मान्सून चा ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच जमिनीमध्ये पेरणी योग्य पुरेसा ओलावा असल्याची खात्री करून वाफसा अवस्थेत पेरणी करावी. • शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांच्या धोक्याची पूर्वसूचना प्राप्त करण्यासाठी दामिनी (Damini- Lightning Alert) हे मोबाईल ॲप गुगल प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअर वरून डाउनलोड करून वापर करावा. • खरीप भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता गादी वाफ्यावर (रोपवाटिका) बियाणे पेरावे. मिरची, वांगी, टोमाटो यांच्या बियाण्यास ट्रायकोडर्मा या बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया करून योग्य अंतरावर ओळीत टाकावे. • वादळी वारा व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतरपाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव वट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. • शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजीघ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. • कृषी उत्पन्न बाजार समिती व खासगी शेतमाल खरेदी धारकांनी शेतकरी बांधवांद्वारा खरेदीसाठी

आणलेला शेतमालउघड्यावर न साठवता शेड मध्ये साठवावा. • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य भाजीपाला व फळांची काढणी करून विक्री करावी. फळबागांनाबांबू च्या सहाय्याने आधार द्यावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजीघ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भात | • पेरीव धान पद्धत: पेरीव पद्धतीने भाताची लागवड ही जुनचा दूसरा आठवडा ते जुलैच्या १० तारखेपर्यंत करावी.दोनदा नांगरटी करून व त्यानंतर डिस्कहॅरो किंवा रोटाव्हेटरणे जमिनीची योग्य मशागत करून भुसभुशीत करावी.कमी ते माध्यम कालावधीच्या भात वाणाची निवड करावी.पेरणी करतानी भाताचे/धानाचे बि जमिनीत ५ से. मी. पेक्षा खोल जाणार नाही याची काळजी घ्यावी.तण नियंत्रणासाठी पेंडीमेथॅलीन ३०% ई. सी. (उगवणपूर्व) @ ५० मि.ली. किंवा प्रेटिलाक्लोर ५०% ई. सी. (उगवणपूर्व) @ २० ते ३० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ओलावा असल्यास लगेच फवारणी व ३० दिवसांनी निंदण करावे.भात/धान पेरणीसाठी नागर, तिफण, मार्कर, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर चलीत पेरणी यंत्र, ड्रम सीडर ईत्यादीचा वापर करता येऊ शकतो. • हिरवळीचे खत:शेतात पाण्याची मुबलक सोय असल्यास हिरवळीच्या खतांची पिके घ्यावित जेणेकरुन पिक जमिनीत गाडल्यानंतर कुजून नत्राचे स्थिरीकरण होइल व जमिनीत सेंद्रिय पदर्थांची उपलब्धता वाढेल. • शेतात लगवड करण्यायोग्य हिरवळीची खते:- हिरवळीची खते शेतात सलग किंवा फळ पिकांमध्ये आंतरपीक म्हणून पेरतात व त्याच शेतात हे पीक फुलो-यावर येण्यापूर्वी शेतात नागंरून मिसळतात. या प्रकारच्या हिरवळीच्या खतांमध्ये ताग, गवार, चवळी, धैंचा, मूग, मटकी, उडीद, ई. पिकांचा समावेश असतो. • खरीप धान:-घरचे बियाणे वापरायचे असल्यास त्याची उगवण शक्ती घरीच तपासून घ्यावी व ७० ते ८०% च्या वर उगवणशक्ती असल्यास ते बियाणे पेरणीसाठी वापरावे तसेच त्या अनुषंगाने बियाण्याचे प्रमाण ठेवावे.पूर्व विदर्भासाठी शिफारस केलेल्या भात वाणांचाच लागवडीसाठी वापर करावा.पेरणीपूर्वी धान बियाण्यास बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रियेसाठी १० लीटर पाण्यात ३०० ग्रॅम मीठ (३%) या प्रमाणात द्रावण करून त्यात बी ओतावे. द्रावण स्थिर झाल्यावर तरंगणारे हलके रोगयुक्त बी चाळणीने काढून जाळून टाकावे. तळातील निरोगी बी २-३ वेळा स्वच्छ पाण्याने धुऊन सावलीत २४ तास वाळवावे. पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया करावी तसेच ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक ४ ते ५ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास चोळून बीज प्रक्रिया करावी. |
| कपाशी | • मध्यम व विस्तारित स्वरूपाचा पावसाचा अंदाज लक्षात घेता कपाशीची धूळ पेरणी टाळावी. • कपाशीची पेरणी जून महिन्यात मान्सूनचा ७५ ते १०० मिमी पाऊस पडल्यानंतरच करावी. • कोरडवाहू पेरणीसाठी कमी ते मध्यम कालावधीच्या बीटी/नॉन बीटी वाणांचा वापर करावा तर बागायती पेरणीसाठी मधयम उशिरा येणारे किंवा उशिरा पक्व होणारे वाण निवडावे. • गुलाबी बोंडअळीचे जीवनचक्र खंडित करण्यासाठी मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झालेल्या शेतात पीक न घेता त्या ठिकाणी पिक फेरपालट करावी. • कापूस हे गुलाबी बोंडअळीचे एकमेव यजमान खाद्य वनस्पती आहे, म्हणून पीक फेरपालट केल्यास या किडीचे जीवनचक्र खंडित होण्यास मदत होते. • रोग प्रवण शेतात मातीजन्य रोग आणि सूत्रकृमीचा निरीक्षणासाठी पीक फेरपालट खूप प्रभावी आहे. • बियाण्यांपासून होणाऱ्या रोगांच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्झिन ३७.५ % + थायरम ३७.५ % डीएस) @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे (मूळ कुज आणि जिवाणूजन्य रोग) किंवा फ्ल्यूक्सापायरोक्सॅड (३३३ जी/एल एफएस) @ १.५ मिली प्रती किलो बियाणे किंवा टेट्राकोनाझोल ११.६ % डब्ल्यू/डब्ल्यू (१२.५ % डब्ल्यू/व्ही) एसएल @ १.५ मिली प्रति किलो बियाणे या प्रमाणात बियाणेजण्य रोगाच्या (मूळ कुज रोग) व्यवस्थापनासाठी बीजप्रक्रिया करावी. • नत्र स्थिरीकरणासाठी अझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळण्यासाठी स्फुरद विरघळविणारे जीवाणू (पीएसबी) २० ते २५ ग्राम प्रती किलो बियाणे प्रमाणात जीवाणू संवर्धकाची बीज प्रक्रिया करावी. • कपाशीमध्ये मुग आणि उडीद यासारख्या आंतरपिकाचा (१:१) ओळीत समाविष्ट करावा. • कपाशी पिकामध्ये सुरुवातीच्या अवस्थेत तणांचे नियंत्रण करण्यासाठी उगवण पूर्व तननाशक पेंडीमेथालिन ३८.७ % सीएस @ ७०० मिली २०० लिटर पाणी प्रती एकर या प्रमाणात वापर करावा. • कपाशी लागवडीसाठी शिफारशीतील अंतर (ओळxदोन झाडातील अंतर) व खतांची मात्रा: अनुक्रमे, देशी वाण (६०x१५, ६०x३० सेंमी, ४०:२०:२० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर), सुधारित (६०x३० सेंमी, ६०:३०:३० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर), कोरडवाहू बीटी संकरीत कपाशीसाठी (९०x४५, ९०x६० सेंमी, ९०:४५:४५ किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर) आणि बागायती बीटी कपाशीसाठी (१२०x३०, १२०x६० सेंमी, १२०:६०:६० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर). |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | • सोयाबीन पेरणी मान्सून च्या आगमनानंतर व १०० मिलीमीटर पाऊस झाल्यानंतरच करावी. • बियाणे पेरणीपूर्वी उगवण चाचणी करून उपलब्ध सोयाबीन बियाण्याच्या गुणवत्तेची खात्री करावी, पेरणीसाठी योग्य रोपांची संख्या सध्या करण्यासाठी उगवण क्षमता 70% असावी. • शेवटच्या वखराच्या पाळी पूर्वी प्रती हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा २.५ टन कोंबडी खत जमिनीत मिसळावे. • शेतकरी बांधवांनी सोयाबीन लागवडीसाठी रुंद वरंबा सरी किंवा सरी वरंबा तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. या पद्धतीमध्ये शेतात पाणी साचून राहणार नाही तसेच पावसाच्या खंड असलेल्या काळात पिक व्यवस्थापन करण्यात मदत होईल. • सोयाबीन पेरणीसाठी शिफारशीमध्ये दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी तर दोन रोपांतील अंतर १० सेंमी ठेवावे व पेरणी हि २ ते ३ सेंमी खोलीवर करावी. • सोयाबीन पिकास शिफारशीत केलेल्या प्रमाणात सर्व पोषक तत्वे (२५:६०:४०:२० किलो प्रती हेक्टरी, नत्र, स्फुरद, पालाश व गंधक अनुक्रमे) संतुलित पद्धतीने फक्त पेरणीच्या वेळी द्यावे. • सोयाबीन पिकासाठी वरील शिफारशीतील अन्नद्रव्याची मात्रा हि (१) ५६ किलो युरिया + ३७५ ते ४०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट + ६७ किलो म्युरेट ऑफ पोटाश किंवा (२) डीएपी @ १२५ किलो + ६७ किलो म्युरेट ऑफ पोटाश + २५ किलो बेंटोनेट सल्फर किंवा (३) १२:३२:१६, २०० किलोप्रती हेक्टर + २५ किलो बेंटोनेट सल्फर प्रती हेक्टर या पैकी कोणत्याही एका रासायनिक खताच्या संयोजनाद्वारे पूर्ण करू शकता. • सोयाबीन पिकामध्ये सुरुवातीच्या काळात रोग आणि किडी पासून संरक्षण करण्यासाठी आणि रोपांची योग्य संख्या सुनिश्चित करण्यासाठी, बियाण्यास बुरशीनाशक आणि कीटकनाशकाची बीज प्रक्रिया करावी. • अॅचझोक्सीस्ट्रोबिन २.५ % + थायोफेनेट मिथाइल ११.२५ % + थायामेथॉक्सम २५ % एफएस (१० मिली/किलो बियाणे) किंवा पेनफ्लुफेन + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन (१ मिली/किलो बियाणे) किंवा थायरम + कार्बोक्झिन (३ ग्रॅम प्रती किलो बियाणे) किंवा किंवा थायरम + मॅन्कोझेब (३ ग्रॅम प्रती किलो बियाणे) या प्रमाणात शिफारस केलेल्या बुरशीनाशकांनी बियाण्याची प्रथम प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर बियाणे काही काळ सुकवावे आणि नंतर थायमिथोक्झाम ३० एफएस १० मिली प्रती किलो बियाणे किंवा इमिडाक्लोप्रिड ४८ एफएस १.२५ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात रासायनिक किटक नाशकाची बीज प्रक्रिया करावी. |
| भुईमूग | • खरीप भुईमुग लागवडीकरिता मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी, भुसभुशीत, वाळू मिश्रित चिकन माती व सेंद्रिय पदार्थ असलेली जमीन निवडावी. भुईमुग लागवडीकरिता जमिनीचा १५ ते २० सेंमी चा थर भुसभुशीत असणे आवश्यक आहे. शेवटच्या वखराच्या पाळीपूर्वी ५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. |
| तूर | • तूर पिक लागवडीकरिता शेतजमीन तयार करावी. तूर पिकाचे चांगल्या प्रतीचे बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून/प्रमाणित बियाणे धारकाकडूनच करावी. तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे जीवाणू (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. तूर पिकाचे शिफारस केलेले वाण- एकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा). |
| मुग | • मूग पिकाच्या लागवडीकरिता पिकेव्ही मूग-८८०२, पिकेव्ही ग्रीनगोल्ड (एकेएम ९९११) या वाणाची निवड करावी. |
| उडीद | • उडीद पिकाच्या लागवडीकरिता टीएयु-१, टीएयु-२, पिकेव्ही उडीद-१५ आणि पिकेव्ही ब्लॅकगोल्ड या वाणाची निवड करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • नवीन संत्रावर्गीय फळ बाग लागवडीसाठी जमिनीची/मातीची योग्यता तपासणे आवश्यक आहे. जमिनीची खोली कमीतकमी १ मीटर असावी परंतु योग्य पद्धतीने खते आणि मशागतीचा अवलंब केल्यास भरघोस उत्पन्न देणाऱ्या फळबागांची लागवड १ मीटर पेक्षा कमी खोली असलेल्या जमिनीमध्ये करता येऊ शकते. फळबाग लागवडीसाठी जमीन हि पाण्याचा चांगला निचरा होणारी, चिकन मातीचे प्रमाण ६० पेक्षा कमी असणारी, सामू ८.३ पेक्षा कमी, मुक्त चुनखडीचे प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी आणि २ मीटर खाली पाण्याची स्थिर पातळी असलेल्या जमिनीची निवड करावी. • लिंबूवर्गीय फळबाग लागवडीसाठी तयार केलेल्या प्रत्येक खड्ड्यांमध्ये २ भाग जमिचीच्या पृष्ठभागावरील माती, १ भाग वाळू आणि १ भाग चांगले कुजलेले शेणखत मिश्र करून भरून घ्यावेत, त्याचबरोबर, प्रत्येक खड्ड्यात १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट, १ किलो निंबोळी केक आणि १०० ग्रॅम क्लोरपायरीफॉस पावडर टाकावी. • संत्रावर्गीय रोपवाटिका धारकांनी पॉलीथीन पिशव्या भरताना सम प्रमाणात गाळाची माती, शेणखत आणि वाळू एकत्र मिश्र करून भराव्यात.पॉलीथीन पिशव्या मध्ये हवा खेळती राहण्यासाठी व तुंबलेले पाणी बाहेर जाण्यासाठी पिशव्यांना छिद्र पाडावीत. • संत्रावर्गीय फळबागा मध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या दिशेने व दोन ओळीनंतर ३० सेंमी खोल, ३० सेंमी खालची रुंदी व ४५ सेंमी वरची रुंदी या आकाराचे चर खोदावेत. झाडाच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहू नये म्हणून आळे व दांड सपाट करून घ्यावेत. • डिंक्या प्रभावित भागाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आतील भागास इजा |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | होणार नाही याची काळजी घेऊन डिंक बाहेर पडतो भाग धारधार चाकूने किंवा पटाशीने खरडून त्या भागावर मेफेनोक्झाम* एमझेड ६८ (५० ग्राम) किंवा फोसेटील एएल (५० ग्राम) १ लिटर पाण्यात मिसळून पेस्ट तयार करून प्रादुर्भाव ग्रस्त भागावर लावावी. ३० दिवसाच्या अंतराने पुन्हा हि पेस्ट लावावी. • संत्र्यावरील मिली बग या किडीच्या नियंत्रणासाठी झाडाभोवतालची जमीन चाळणी करून मोकळी करावी. झाडाच्या खोडाला प्लास्टीकचा पट्टा बुंध्या भोवती गुंडाळावा व त्यावर मोबिल ऑईल किंवा ग्रीस लावावे. मुंग्यांचे वारूळ बगीच्यामधून नष्ट करावे त्यासाठी क्लोरोपायरीफॉस २० ईसी ५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून मुंग्यांचे वारुळात टाकावे. मिली बग च्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २० ईसी २ मिली किंवा डायमेथोइट २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या बुंध्यावर फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना टॅग/लेबल वरील संपूर्ण माहिती जसे कि, पिकाचे नाव, वाण/जात, उगवणशक्ती, भौतिक व अनुवांशिक शुद्धता टक्केवारी, निव्वळ वजन, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीज प्रक्रियेला वापरलेले रसायन, तसेच विक्रेत्याचे नाव व पत्ता इत्यादि माहिती तपासून घ्यावी. • बियाणे विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या बियाण्याची पक्की पावती/बिल घ्यावे, त्यावर विक्रेता आणि खरेदी करणारे शेतकरी यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. |